**<u>रे.मु.नं. ११२/२०१८</u>**

**<u>नि.क्र.१३६</u>**

**<u>प्रतिवादी क्र. ३ चा सरतपास वकिल श्री. सिंग यांचेतर्फे शपथेवर सुरु.</u>**

१. न्यायालयात दाखल केलेल्या शपथपत्रातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे.

सरतपास पूर्ण.

**<u>वादीतर्फे उलटतपास वकिल श्री. जी जी पारखे यांचेकडून शपथेवर सुरु.</u>**

२. कचरु मुरलीधर कणसे हा माझा सख्खा भाउ आहे. कचरुचा जबाब होतेवेळेस मी न्यायालयात हजर होतो. वाद मिळकत या वडीलोपार्जित मिळकत आहे. सुषमा तुकाराम आढाव ही माझी लग्न झालेली बहिण आहे. हे म्हणणे खोटे आहे की, ती नोकरीस नव्हती.

३. कचरु यास दोन पत्नी असून एकिचे नाव आशा व दुसरीचे नाव सुमन आहे. हे म्हणणे खोटे आहे की, हे तिघे एकत्र राहतात. सुमन व कचरु यांच्यामध्ये घटस्फोट झाला नाही. सुमन कचरु कणसे हिचे नावे दावा मिळकतीमधील १ हे ४१ आर इतके क्षेत्र आहे. सुमन हिच्या नावे सदरचे क्षेत्र आमच्या वडीलांनी केले. गट क्र. २५६ व २५७ मध्ये माझ्या नावे प्रत्येकी ९३ गुंठे इतके क्षेत्र आहे. माझ्या मुलाचे नाव राहुल दत्तात्रय कणसे असून त्याचे नावे कोणतेही क्षेत्र नाही. संतोष कचरु याचे नावे गट क्र. १९९ मध्ये काही क्षेत्र आहे. हे म्हणणे खोटे आहे की, गट क्र. २५६ व २५७ मध्ये मला प्रत्येकी ९३ गुंठे जमिन मिळण्याकरिता मी व कचरु याने एकत्रीत रित्या तहसिल कार्यालयात अर्ज केला होता. वर्ष २०१० मध्ये या जमिनी माझ्या नावे लागलया.

४. मुरलीधर भिकाजी कणसे हे माझे वडील आहे. आमच्या वडीलांच्या मृत्यूनंतर त्यांच्या वारसांच्या दावा मिळकतीमध्ये नोंदी लागल्या. बद्रीनारायण मुरलीधर कणसे हा माझा सख्खा भाउ आहे. दाव्यात नमुद चंद्रशेखर व नितीन ही बद्रीनारायण याची मुले आहेत. चंद्रशेखर व नितीन यांनी आमच्याकडे हिश्याची मागणी केली होती. साक्षीदार स्वतः हून सांगतो की, आम्ही देखील देण्यास तयार होतो. चंद्रेखर व नितीन ताबा घेण्यास आले नसल्याकारणाने वाटणी होवू शकली नाही. नितीन व चंद्रशेखर यास कायदयाने येणारा हिस्सा देण्यास आम्ही तयार आहोत.

नितीन व चंद्रशेखर हे दोघे मुंबईस राहावयास आहेत. चंद्रशेखर व नितीन हे दावा मिळकती कसत नाही, पण त्यांच्या नावे क्षेत्र आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केले असून आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

प्रतिवादी क्र.१,११ व १२ यांच्या वकिलांनी आजरोजी शपथपत्र घेतले असल्याकारणाने त्यांच्या तोंडी विनंतीवरुन दिनांक २२/०८/२०२४ पर्यंत साक्षीदाराचा उलटतपास तहकुब.

प्रतिवादी क्र.४ ते १० यांचे वकिल श्री.व्ही.टी शिंदे यांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर, कोणताही तहकुबीचा अर्ज नाही.

प्रतिवादी क्र ७ हजर, पण त्यांच्या वकिलांच्या अनुपस्थितीमुळे उलटतपास घेण्यास असमर्थ.

कोणताही तहकुबीचा अर्ज नसल्याने प्रतिवादी क्र. ४ ते १० यांचेविरुध्द उलटतपास नाही असा आदेश पारित.

प्रतिवादी क्र. १५ चे वकिल हजर, पण आजरोजी तयारी अभावी उलटतपास घेण्यास असमर्थ, त्यांच्या तोंडी विनंतीवरुन दिनांक २२/०८/२०२४ पर्यंत उलटतपास तहकुब.

प्रतिवादी क्र. १३ चे वकिल श्री.एम.एस खिल्लारी हजर, त्यांच्या तोंडी विनंतीवरुन साक्षीदाराचा उलटतपास दुपार मध्यांतरापर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृती,

सही/-

दिनांक -०८.०८.२०२४

(विनय बी.कांबळे)

सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,

श्रीरामपुर

प्रतिवादी क्र. १३ चे वकिल श्री.एम.एस खिल्लारी यांनी तोंडी विनंती केल्याने उलटतपास तारीख २२/०८/२०२४ पर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृती,

सही/-

दिनांक -०८.०८.२०२४

(विनय बी.कांबळे)

सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,

श्रीरामपुर